IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

# पर्यावरणवादी साहित्य आणि मानवी संवेदना: माणूस- निसर्ग नात्याचा अभ्यास

**प्रा. कल्पना दत्तात्रय शिंगाडे**
मराठी विभाग, विलिंग्डन महाविद्यालय,
सांगली (स्वायत्त)
kshingade3838@gmail.com

**सारांश** (Abstract) : पर्यावरण पृथ्वीवरील सर्व सजीवांच्या जीवनाचा आधार आहे. मानव, प्राणी, वनस्पती आणि इतर जीवनसृष्टीवर अवलंबून असते. परंतु आधुनिक काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे माणसाने निसर्गावर मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप केला आहे. औद्योगिकरण शहरीकरण आणि लोकसंख्या वाढीमुळे जंगलतोड वाढली आहे.प्रदूषण वाढले आहे आणि नैसर्गिक संसाधनाचा अतिवापर होऊ लागला आहे.त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत आहे.

या परिस्थितीचा परिणाम हवामानावर दिसून येतो.पावसाचे प्रमाण कमी किंवा जास्त होणे दुष्काळ व पूर ,तापमान वाढ आणि हिमनद्यांचे वितळणे अशा समस्या निर्माण झाल्या आहेत .त्यामुळे पर्यावरणाचा प्रश्न हा जागतिक स्तरावर अत्यंत महत्त्वाचा बनला आहे. या पार्श्वभूमीवर साहित्यिकांनी आपल्या लेखनातून पर्यावरणाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे. पर्यावरणवादी साहित्य हा असा साहित्य प्रवाह आहे ज्यामध्ये निसर्गाचे महत्त्व पर्यावरणाचे संरक्षण आणि माणूस निसर्ग -संबंध यांचे चित्रण केले जाते.व साहित्याच्या माध्यमातून पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे कार्य केले जाते.

मराठी साहित्यात अनेक कवींनी निसर्गाचे विविध रूप अत्यंत सुंदर आणि संवेदनशील पद्धतीने मांडले आहे. उदा- ना.धो.महानोर,इंदिरा संत यांच्या कवितांमध्ये निसर्गाचे सौंदर्य ,ऋतूचे बदल, पाऊस, दुष्काळ आणि ग्रामीण जीवन यांचे प्रभावी चित्रण आढळते.ना.धो.महानोर यांच्या कवितांमध्ये ग्रामीण जीवन आणि शेतीशी निगडीत निसर्गाचे वास्तववादी चित्रण दिसते आणि इंदिरा संत यांच्या कवितांमध्ये निसर्गाशी जोडलेल्या मानवी भावनांचे सूक्ष्म वर्णन आढळते.

अशाप्रकारे ना. धो. महानोर यांच्या कवितेत निसर्ग हा मानवी जीवनाचा आधार आणि ग्रामीण वास्तवाचे प्रतीक आहे तर इंदिरा संत यांच्या कवितेत निसर्ग हा मानवी मनातील भावना आणि संवेदनाचा आरसा आहे. अशाप्रकारे दोन्ही कवींच्या कविता मधून पर्यावरण आणि मानवी जीवनाचे घनिष्ठ परस्परावलंबी नाते स्पष्ट होते.

**की - वर्ड** : एकविसाव्या शतकातील दलित कवितेतील जाणीवा

## I. प्रस्तावना :

मानव आणि निसर्ग यांच्यातील संबंध हा मानवाच्या अस्तित्वाइतकाच प्राचीन आहे. मानव निसर्गाचा एक घटक असून त्याचे जीवन, संस्कृती आणि भावना या सर्व गोष्टी निसर्गाशी निगडीत आहेत. हवा, पाणी, अन्न, निवारा या सर्व गरजांसाठी माणूस निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे निसर्ग हा केवळ उपभोगाचा स्त्रोत नसून तो मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे.

पर्यावरण साहित्यामध्ये मानवी संवेदना प्रकर्षाने दिसून येतात. निसर्गातील बदल, पर्यावरणाचा ऱ्हास, आणि त्याचा मानवी जीवनावर होणारा परिणाम यामुळे माणसाच्या भावना अधिक तीव्र होतात. आजच्या औद्योगिकीकरणाच्या आणि जागतिकीकरणाच्या युगात माणूस निसर्गापासून दूर जात आहे. त्यामुळे या नात्याचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे.

## II. मानव - निसर्ग नात्याची पार्श्वभूमी :

मानव आणि निसर्ग यांचे नाते हे परस्परावलंबी आणि जिव्हाळ्याचे आहे. प्राचीन काळापासून माणूस निसर्गाशी संवाद साधून जगत आला आहे. मानवाच्या स्थितीची सुरुवात निसर्गाच्या कुशीतच झाली. आदि मानवाच्या जीवनात निसर्गाला देवत्वाचे स्थान होते. सूर्य,


DOI: 10.48175/IJARSCT-37521

IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

चंद्र वारा, पाऊस, वृक्ष यांना तो पूज्य मानत असे. यावरून मानव-निसर्ग नात्याची सुरुवात आदर कृतज्ञता आणि सहअस्तित्व यावर आधारित होती हे स्पष्ट होते.

काळानुसार मानवाची बुद्धी विकसित झाली. त्यांने विज्ञान - तंत्रज्ञानाचा वापर करून निसर्गावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. शेती, उद्योग, वाहतूक, शहरे यांचा विकास झाला. यामुळे मानवाचे जीवन अधिक सोयिस्कर झाले. पण याच बरोबर निसर्गाशी असलेले संतुलन बिघडू लागले. जंगलतोड, प्रदूषण, ऋतूचे विस्थापन पर्जन्यमानातील नियमितपणा आणि उष्णतेत वाढ यासारख्या समस्यां निर्माण झाल्या. निसर्गाचा अतिरेक वापर केल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होऊ लागला. निसर्गाचा मानवी जीवनावर जसा परिणाम होतो.तसाच परिमाण मानवी जीवनाचा निसर्गावर होत असतो.

आधुनिक काळात हवामान बदल ही मानवजाती समोरील एक गंभीर आणि व्यापक समस्या बनली आहे. या पार्श्वभूमीवर 'पर्यावरणवादी साहित्य' ही संकल्पना उदयास आली. या साहित्य प्रकारामध्ये निसर्गाशी असलेल्या मानवी नात्याचा, पर्यावरण समस्यांचा आणि मानवी संवेदनाचा सखोल अभ्यास केला जातो. मराठी साहित्यात निसर्ग आणि मानव यांचे अतूट नाते विविध कवींनी प्रभावीपणे मांडलेले आहे.

विशेषता: ना.धो. महानोर आणि इंदिरा संत यांच्या कवितामध्ये मानव - निसर्ग नाते यांच्यातील संबंधाचे वास्तववादी चित्रण आढळते.

ना.धो.महानोर यांच्या कवितेतील माणूस- निसर्ग नाते :

ना.धो. महानोर हे आधुनिक मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे निसर्ग कवी आहेत. त्यांचे बालपण ग्रामीण वातावरणात गेले असल्यामुळे त्यांच्या कवितांमध्ये निसर्गाशी असलेले जिव्हाळ्याचे नाते स्पष्ट दिसते. त्यांच्या कवितांचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे निसर्गाशी असलेली जवळीकता. त्यांच्या कवितांमध्ये माती, शेती, पाऊस, वनराई, पक्षी, नद्या यांचे अत्यंत जिवंत चित्रण आढळते.

**"या नभाने ह्या भुईला दान द्यावे**
**आणि ह्या मातीतुनी चैतन्य गावे L**
**कोणती पुण्य अशी येती फळाला**
**जोंधळ्याला चांदणे लखडून यावे"**

कवीने आपल्या काव्यातून निसर्गाचे अस्सल दर्शन घडवलेले आहे. ना.धो. महानोर यांची कविता म्हणजे रानातली सुख-दुःख आणि सगळे रान आपल्या कवितेमधून साकार करते.

आकाशाने पावसाच्या रूपाने पृथ्वीला दान द्यावं म्हणजेच पाऊस पडून जमीन सुपीक व्हावी. पावसामुळे मातीतून जीवन उगवावं, हिरवळ यावी, सृष्टी जिवंत व्हावी इतकं सुंदर दृश्य पाहायला मिळणे म्हणजे कोणत्या चांगल्या कर्माचं फळ असेल? असा आश्चर्य भाव कवी व्यक्त करतात. कवी पुढे म्हणतो की जोंधळ्याच्या पिकांवर चांदणं पडून ते अधिकच सुंदर दिसावं म्हणजेच निसर्गाची शोभा आणि भरभराट शिखराला जावी.

हा कवी खरोखरच जागोजाग झाडाझुडपांशी,पाटबंधाऱ्याशी, गुरा वासरांशी, पाखरांशी, मेघांशी खेळ मांडून गातो आहे असे दिसते. कवीने स्वतःला शब्द गंधाने वाहून घेतलेले आहे. रानातील निसर्गाचे देखणे रूप, पावसाचा लहरीपणा, शेतीचे चक्र आणि माणसाचे भावनिक नाते शब्दबद्ध केले आहे. निसर्ग मानवाचा पोशिंदा असून तो माणसाचे जगणे समृद्ध आणि जिवंत करतो असे कवीला म्हणायचे आहे.

ना.धो. महानोर यांच्या पावसाळ्याच्या कवितेतील खालील ओळी अतिशय भावस्पर्शी असून निसर्गातील सौंदर्याचे आणि कवीच्या अंतर्मनातील आनंदाचे चित्रण कवी करतात.

**"मी माझ्या मुलखात नांदतो ऐश्वर्याच्या राजा**
**इथल्या मातीमध्ये रुजविल्या चैतन्याच्या बागा L**
**इथले रानोमाळ सघन घन पसारित हिरवी दाही**
**झुलत झुलत मस्तीत बुडाले गाणे आणिक मी ही".**

कवी म्हणतो, मी माझ्या मातीत देशात खूप आनंदाने आणि अभिमानाने राहतो. माझ्यासाठी माझा प्रदेश हा एखाद्या राजाच्या ऐश्वर्यासारखा मौल्यवान आहे. म्हणजेच या भूमीच्या समृद्धीचा राजा असल्याचे कवी सांगतो. येथे ऐश्वर्य म्हणजे संपत्ती नव्हे तर निसर्गाची भरभराट, हिरवाई आणि आनंद आहे. कवीला आपल्या भूमीचा प्रचंड अभिमान आहे.

पावसामुळे जमिनीत नवजीवन निर्माण झाले आहे. मातीमध्ये चैतन्य फुलले आहे अर्थात सर्वत्र सजीवपणा आणि ताजेपणा पसरलेला आहे. इथले माळोरान, जंगल आणि शेत वाटा हिरव्या रंगाने नटलेली आहे आणि संपूर्ण परिसर बहरून गेलेला आहे.

झाडे आणि वेली वाऱ्यावर हलत आहेत. जणू काही त्या आनंदाने नाचत आहेत. हा सगळा निसर्ग जणू गाणे गात आहे. त्या गाण्यात कवी मग्न झाला आहे आणि स्वतः निसर्गाशी एकरूप होऊन या गाण्यात, या मस्तीमध्ये हरवून जातो. इथले वातावरण इतके सुंदर आणि आनंदी आहे की जणू गाणी, वारा आणि निसर्ग सगळेच मस्तीत डोलत आहेत.

एकंदरीत या ओळींमधून कवीने पावसाळ्यातील निसर्गाची समृद्धी, आनंददायी जीवन यांचे सुंदर चित्रण केलेले आहे .कारण कवी मातीला आईसारखे मानतो. ती त्याला जगवते, पोसते. यातून माणूस आणि निसर्ग यांच्या नात्यातील जवळीकता कवीने प्रभावीपणे व्यक्त केले आहे.

कवी निसर्ग केवळ पाहत नाही तर निसर्गाशी एकनिष्ठ होतात. त्यांच्या कवितेत रानातील ओढा, पाऊस, कोकीळ, माती आणि शेतकरी यांचा अविभाज्य संबंध दिसतो. पावसाला मानवी जीवनाशी जोडून माणसासाठी निसर्ग सर्वस्व आहे असे त्यांचे सांगणे आहे.

कवीचा शेतकरी कुटुंबात जन्म झाल्याने व अंगी उपजतच प्रतिभा शक्ती असल्याने दिवसभर हिरव्या -पिवळ्या पिकांमधून रानातल्या पायवाटा तुडविताना सभोवताली असणारी हिरवी झाडी, डोंगर- द-या, झरे त्यातून खळखळणारे पाणी या सगळ्यांच्या साक्षीने 'रानातल्या कवितांचा' जन्म झाला. तसेच त्यांच्या कवितेत अजिंठा डोंगररांगा, पळसखेडा परिसर, शेत शिवार आणि मातीचा सुगंध भरभरून राहिलेला आहे.म्हणूनच 'निसर्ग आणि माणूस यांचं अतूट नातं जपा' असा संदेश कवीने आपल्या काव्यातून दिलेला दिसतो. जो आजच्या काळाची नितांत गरज आहे. निसर्गाशी माणसाची असलेले नाते, मानवी जीवनातील विविध भावना त्यांनी अतिशय हळूवार आणि प्रभावीपणे व्यक्त केलेले आहे.

**उदा** - प्रेम, दुःख, आशा, संघर्ष या भावनांचा साध्या आणि सरळ भाषेत आविष्कार केला आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी, त्यांचे कष्ट आणि त्यांची झुंज यांचे वास्तव चित्रण दिसते.

'पानझड' या कविता संग्रहामध्ये ना.धो. महानोर यांनी जीवनातील बदल, निसर्गातील ऋतुचक्र आणि माणसांच्या मनातील भावविश्व यांचे अत्यंत संवेदनशील चित्रण केले आहे. 'पानझड' म्हणजे झाडांची पाने, गळण्याचा काळ याचे वर्णन करताना कवी मानवी जीवनातील दुःख, विरह, एकटेपणा वेदना आणि रिक्तता यांची तुलना करतात. त्यामुळे कविता अधिक अर्थपूर्ण आणि विचार करायला लावतात यावरून निसर्गाशी असलेले माणसाचे नाते स्पष्टपणे दिसते.

तसेच जीवनातील संघर्ष, अपयश, निराशा यांचा ही उल्लेख दिसून येतो. परंतु त्याचबरोबर आशेचा किरण ही दिसतो जसे पानझडी नंतर पुन्हा नवीन पालवी फुटते. तसेच माणसाच्या जीवनात ही पुन्हा नवीन सुरुवात होऊ शकते. हा सकारात्मक संदेश कवी देतात.

इंदिरा संत यांच्या कवितांमध्ये निसर्गाचे अत्यंत सूक्ष्म कोमल आणि भावनिक चित्रण आढळते. त्यांच्या कवितेत निसर्ग हा मानवी मनाचा आरसा आहे. निसर्ग हा केवळ पार्श्वभूमी नसून तो मानवाच्या भावना, अनुभव आणि अंतर्मनाशी घट्ट जोडलेला एक जिवंत घटक आहे.

इंदिरा संत या मराठी काव्यसृष्टीतील एक अद्वितीय कवयित्री आहेत. त्यांच्या कवितांमध्ये निसर्ग हा फक्त दृश्यात्मक रंगवटा नसून मानवी मनाची गाठ घालणारा अनुभव म्हणून दिसतो. तसेच त्यांच्या लेखन शैलीत निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण, साधेपणा आणि प्रतिकात्मकता यांचा सुंदर संगम आहे.

पाऊस, वारा, झाडे, फुले आकाश यांचे वर्णन करताना त्या फक्त त्यांचे दृश्य दाखवत नाहीत तर त्या माध्यमातून मानवी मनातील वेदना, आनंद, एकाकीपणा, शांतता व्यक्त करतात. दु:खाचा निचरा करण्यासाठी त्यांनी शब्द आणि प्रतिमांचा आधार घेतला.पावसाचे वर्णन करताना केवळ थेंब नाही तर त्या थेंबा मधून उमटणारी आतली ओल आणि भावविश्व दर्शवतात. पानांची सळसळ, फुलांची कोमलता, प्रकाश -छायांचा खेळ ही सर्व इंदिरा संत यांनी अत्यंत नेमकेपणाने मांडले आहे.साध्या भाषेतून त्या मनोभावनांचा खोल अर्थ व्यक्त करतात आणि निसर्गातील घटकांना प्रतिकात्मक अर्थही देतात.

**उदा** - कोमजलेले फूल म्हणजे खिन्नता तर उमलणारे फूल म्हणजे आशा.

इंदिरा संत यांची निसर्गदृष्टी अत्यंत शांत, अंतर्मुख आणि जिव्हाळ्याची आहे. निसर्गाशी आत्मीय नाते जोडतात. त्यांच्या कवितेतील भाषा अधिक काव्यात्मक नाजूक आणि अलंकारिक आहे.

**"नको नको रे पावसा असा अवेळी धिंगाणा**
**घर माझे चंद्रमौळी आणि दारात सायली**

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

नको नाचू तडा तडा असा कौलारावरून
तांबे सतेली पातेली आणू भांडी मी
कुठून?"

इंदिरा संत यांच्या वरील कवितेतील ओळीमध्ये साध्या, सर्वसामान्य जीवनातील निसर्गाशी असलेले जिव्हाळ्याचे आणि वास्तववादी नाते अत्यंत प्रभावीपणे व्यक्त झाले आहे. या ओळीत कवयित्री पावसाशी जणू संवाद साधत आहे आणि त्याला विनंती करत आहे की, तो अवेळी आणि अतिशय जोरात कोसळून नये.

कवितेतील "घर माझे चंद्रमोळी" या वाक्यातून कवयित्रीचे घर साधे, कौलारू आणि नाजूक असल्याचे दिसते. 'दारात सायली' या उल्लेखातून घरासमोरील नाजूक वेल दर्शवली आहे. जी पावसाच्या जोरात खराब होऊ शकते. 'नको नाचू तडातडा असा कौलारू वरून' या ओळीत पावसाचा थेंबाचा छपरावर होणारा तडतड आवाज आणि त्यातून निर्माण होणारी भीती व्यक्त केली आहे. शेवटच्या ओळीत तांबे सतेली, पातेली आणू भांडी मी कोठून? असे म्हणत कवयित्री आपल्या मर्यादित साधनांची जाणीव करून देतात.

जोरदार पावसामुळे छपरातून पाणी गळल्यास ते साठवण्यासाठी आवश्यक भांडी तिच्याकडे नाहीत. ही तिची असहाय्यता स्पष्ट होते.या ओळीमधून निसर्ग आणि मानव यांच्यातील नाते अतिशय सूक्ष्मपणे उलगडते. मानव पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे.पाऊस हा जीवनासाठी आवश्यक असला तरी त्याचा अतिरेक माणसासाठी संकट निर्माण करतो. त्यामुळे निसर्गाशी असलेले नाते हे केवळ आनंदाचे नसून त्यात भीती आणि असुरक्षितता ही आहे. निसर्गाचे अनिश्चितता या कवितेतून प्रकर्षाने जाणवते .

तसेच या कवितेत निसर्गाला सजीव मानून त्याच्याशी संवाद साधण्याची भारतीय संस्कृती दिसून येते. कवयित्री पावसाशी बोलते, त्याला समजावते यातून मानव आणि निसर्ग यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते स्पष्ट होते. शेवटी ही कविता आपल्याला निसर्ग आणि मानव यांच्यातील संतुलनाचे महत्त्व पटवून देते. निसर्गाचा योग्य प्रमाणात होणारा वर्षाव मानवासाठी वरदान असतो. परंतू त्याचा अतिरेक झाला की संकट येते. त्यामुळे मानव आणि निसर्ग यांच्यात समतोल राखणे आवश्यक आहे. इंदिरा संत यांनी अत्यंत साध्या शब्दातून प्रभावीपणे मांडले आहे.

मेंदी, मृगजळ यासारख्या संग्रहात निसर्गातील झाडे, पाने, फुले, पक्षी आणि बदलणारे ऋतू हे स्त्रीच्या मनातील भावनांचे प्रतिक म्हणून येतात. त्यांच्या कवितेतील स्त्री निसर्गाच्या सानिध्यात स्वतःच्या दुःखाला विसरून जाते. निसर्गाशी संवाद साधून मनाचा भार हलका करते. निसर्गाची प्रतिमा अतिशय हळुवार आणि चित्रमय पद्धतीने मांडलेली आहे.इंदिरा संत यांनी अनेक कवितांमध्ये निर्जीव निसर्गाला सजीव रूप दिले आहे. झाडे, फुले यांच्याशी संवाद साधणारी कवयित्री निसर्गाच्या लयबद्धतेत स्वतःचे अस्तित्व शोधते.

मराठी साहित्यातील नैसर्गिक पर्यावरणाचा शोध घेत असताना असे लक्षात येते की, कृषी संस्कृतीचा होणारा ऱ्हास, लोप पावत चाललेली ग्रामसंस्कृती, निसर्गात घडणारे नाट्यपूरण बदल, सतत बदलणारे ऋतुचक्र, निसर्गाचा लहरीपणा आदी बाबींचे चित्र मराठी साहित्यातून व्यक्त झाले आहे.

## III. समारोप :

आज आधुनिक संगणकीय युगात मानव स्वतःचे जीवन अधिक सुखाकडे घेऊन जात असताना मानवाचा निसर्गातील हस्तक्षेप वाढत आहे. तंत्रज्ञानाच्या साह्याने मानवाने नेत्र-दिपक प्रगती केली असली तरी दुसरीकडे नैसर्गिक आणि मानवनिर्मित पर्यावरणीय समस्यांनी मानवाला ग्रासून टाकले आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी मानव मोठ्या प्रमाणात पर्यावरणाचा ऱ्हास करत आहे. त्याचे दुष्परिणाम सर्व मानव जातीला भेडसावताना दिसून येत आहे.

तसेच हवामान बदलामुळे मानव-निसर्ग नात्यात मोठे परिवर्तन झाले. या बदलामुळे हे नाते अधिक गुंतागुंतींचे ,अस्थिर झाले आहे. कवी ना. धो. महानोर आणि इंदिरा संत यांच्या कवितेमधून माणसाला पुन्हा एकत्र येण्याचा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश मिळतो.

## IV. निष्कर्ष :

१) ना.धो.महानोर यांच्या कवितेत ग्रामीण जीवन, पाऊस, शेती आणि ऋतुचक्र याद्वारे माणूस - निसर्गाचे जिवंत वास्तववादी नाते स्पष्ट होते.

२) इंदिरा संत यांच्या कवितेत निसर्गाचे सूक्ष्म, भावस्पर्शी आणि अंतर्मुख चित्रण आढळते.

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in
DOI: 10.48175/IJARSCT-37521

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

३) ना.धो. महानोर यांच्या कवितेत पर्यावरणीय जाणिवा आणि मानवी संवेदनाचा तुटत जाणारा धागा या विषयाची जाणीव प्रकर्षाने जाणवते.
४) 'पावसाळी कविता' या कवितासंग्रहातून सामाजिक भान जपणाऱ्या कवितांचा अविष्कार दिसतो.
५) ना.धो. महानोर यांनी मराठी ग्रामीण कवितेच्या विश्वात आपल्या लेखणीतून एक वेगळी छाप उमटवलेली आहे.

### संदर्भ ग्रंथ :

१) इंदिरा संत यांची समग्र कविता - संपादक अरुणा ढेरे, पॉप्युलर प्रकाशन.
२) ना.धो. महानोर - रानातल्या कविता, पॉप्युलर प्रकाशन.
३) ना.धो. महानोर - पावसाळी कविता पॉप्युलर प्रकाशन.
४) मराठी ग्रामीण कविता लेख, सुरेश एजन्सीज,पुणे.

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in
DOI: 10.48175/IJARSCT-37521